## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६१८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–२७/०९/२०१६

**१) महीलेच्या गळयातील सोन्याची गाठी जबरीने हिसकावुन नेल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २६/०९/२०१६ चे १६.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी ही आपल्या घरासमोर गाईला पोळी देवुन घरी परत जात असतांना यातील दोन अनोळखी आरोपीतांनी संगनमत करून मोटार सायकल ने तीच्या जवळ जावुन गळयातील सोन्याचे मंगळसुत्र (गाठी) ज्यात सोन्याचे १०० पिटीव मनी बारीक अंदाजे ५ ग्रॅम, दोन लहान डोरले २ ग्रॅम, डोर ३ ग्रॅम असा एकुण १० ग्रॅम सोन्याची गाठी कि. २०,०००/–रू. चा माल जबरीने हिसकावुन पळुन घेवुन गेला असे फिर्यादी सौ. सुनंदा कैलास धोतरे वय ४५ वर्ष रा. दुर्गा नगर तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. श्रीवास पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) घरातुन मोबाईलची चोरी . :–**

दिनांक २६/०९/२०१६ रोजी ०७.३० वा. ते ०८.०० वा. दर. यातील आरोपीने फिर्यादीच्या घरी जावुन घरातील टिव्ही जवळ ठेवलेला जिवोनी एल ७०० कंपनीचा मोबाईल कि. २३००/–रू. चा चोरून नेला असे फिर्यादी सौ. कविता किशोर शेंडे वय २८ वर्ष रा. साकोली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) घरात प्रवेश करुन मोबाईल बॅटरी, चार्जर व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक २४/०९/२०१६ रोजी १०.०० वा. दर. यातील फिर्यादी प्रभुदास तुकाराम चवरे वय ७१ वर्ष, रा. पिपरी हा आपल्या घरी हजर नसतांनी कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण घरात प्रवेश करुन १ मोबाईल बॅटरी कि. ३००/–रु. १ मोबाईल चार्जर कि. ६०/–रु. व नगदी ५,०३०/–रु. असा एकुण ५,३९०/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मुंडले पो. स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**४) ओमनी गाडीची मोटार सायकलला धडक एक जखमी . :–**

दिनांक २४/०९/२०१६ रोजी १४.०० वा. दर. यातील फिर्यादी व जखमी हे आपआपल्या परिवारासह चांदपुर देवस्थान पाहण्यास आले असता देवस्थान पाहुण ग्रिनव्हॅली जलाशय पाहण्यास जात असतांना समोरुन येणा–या यातील ओमनी गाडी आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन लापरवाहीने, निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकल क्र. एमएच ३५ एबी ८९४० ला धडक देवुन चालक –जयकुमार छगनलाल वय ३२ वर्ष, रा. कोडेलोहारा यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी विनोद जयलाल पटले-वय ३२ वर्ष, रा. सिल्ली जि. गोदिंया यांचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३३८ भांदवि. सहकलम १३४,१८७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. लिल्हारे पो. स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

५) **अवैध दारु -/जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक २६/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, साकोली व लाखांदुर,येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २० लिटर हात भट्टी दारू कि. २,०००/–रू. तसेच ५ लिटर देशी २२० मिली देशी दारू कि. १,९५०/–रू. तसेच जुगारातुन कि. १७९ असा एकुण ४,१२९/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.